## प्रेसनोट दिनांक ३०/०७/२०२४

# दिड वर्षापुर्वी बेपत्ता झालेल्या, रमण साबळेचा खुन झाल्याचे, शहर गुन्हे शाखेने केले उघड.

---

दि.११/०४/२०२३ रोजी इसम नामे रमन सातप्पा साबळे, वय-३६ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.१५१, लक्ष्मी पेठ, देगांव रोड, सोलापूर हा आंबेडकर जयंती निमित्त मुंबई येथे जातो असे सांगुन, सायंकाळी ०५.०० वा. राहते घरातुन गेला होता. परंतु तो पुन्हा घरी परत आला नाही. त्यामुळे, त्याची आई श्रीमती मिना सातप्पा साबळे यांनी, फौजदार चावडी पोलीस ठाणेस मुलगा बेपत्ता झाले बाबत खबर दिली होती. त्यानुसार **फौजदार चावडी पोलीस ठाणे मिसिंग नं-३६/२०२३ प्रमाणे दि.१८/०४/२०२३ रोजी दाखल होते.** त्याअनुषंगाने, सदर मिसिंगचा तपास फौजदार चावडी पोलीस ठाणेकडून करण्यात येत होता.

बेपत्ता इसम नामे- रमन सातप्पा साबळे याचा माहे एप्रिल २०२३ पासून शोध लागला नाही. त्यामुळे, त्याची आई श्रीमती मिना सातप्पा साबळे यांनी, मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांना समक्ष भेटुन मुलाचा शोध व्हावा म्हणून विनंती केली होती. त्यानुसार, मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी, बेपत्ता इसमाचा शोध घेणेबाबत, मा. डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), सोलापूर शहर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार, **मा. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) सोलापूर शहर यांनी,** गुन्हे शाखेचे व.पो.नि. श्री. सुनिल दोरगे, स.पो.नि. संदीप पाटील, व सायबर पोलीस ठाणेकडील अंमलदार प्रकाश गायकवाड यांना, समक्ष बोलावुन, बेपत्ता इसम तसेच संशयीत इसमाचे मोबाईल क्रमांकाची तांत्रीक माहिती व बँक व्यवहाराचे सखोल अभ्यास करून, बेपत्ता इसमाचा प्राधान्याने शोध घेणे बाबत मार्गदर्शन करून, सदरचा अर्ज पुढील चौकशी करीता, **गुन्हे शाखेचे स.पो.नि. संदीप पाटील यांना दिला होता.**

सदर अर्जाचे चौकशीत स.पो.नि. संदीप पाटील व त्याचे पथकाने इसम नामे- रमन साबळे हा बेपत्ता झाले पासुनची फौजदार चावडी पोलीस ठाणेकडून सविस्तर माहिती प्राप्त करून घेतली. तसेच बेपत्ता इसमाची आई, पत्नी, भाऊ, तसेच तो, ज्या बँकेत कामास होता, त्या बँकेतील मित्रांकडे विचारपूस केली असता, घरगुती वाद तसेच कामाचे ठिकाणी देखील कोणा सोबत वाद नसल्याचे दिसुन आले. बेपत्ता इसमाचे मोबाईल बाबत तांत्रीक तसेच बँक व्यवहाराची सविस्तर माहिती प्राप्त केली असता, बेपत्ता इसम नामे- रमन साबळे याचा इसम नामे विशाल बनसोडे याचेशी संपर्क तसेच त्यांचेत पैशाचा व्यवहार झाल्याचे दिसुन आले.

त्यानुसार **स.पो.नि. संदीप पाटील व त्यांचे तपास पथकानी,** दि.२६/०७/२०२४ रोजी विशाल दत्तात्रय बनसोडे वय-३६ वर्षे, रा. सावित्रीबाई फुले हौ. सोसायटी, संभाजीपुर, नांदणी रोड, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी प्रथम खोटी व दिशाभुल करणारी माहिती दिली. परंतु, त्यास बेपत्ता इसमा सोबत त्याचे पैशाच्या व्यवहारा बाबत व फोन वरून यापुर्वी झालेल्या संभाषणा संबंधाने सखोल विचारपूस केली असता, त्यांनी सांगीतले की, **दि.११/०४/२०२३ रोजी, रात्री सांगोला तालुक्यातील, अनकढाळ टोल नाक्याजवळील राजुरी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे बाजुस असणाऱ्या माळरानावर, त्या दोघांमध्ये ४७,००,०००/- रुपये पैशाच्या देवाण-घेवाणी वरून वाद झाला. त्या वादामध्ये, विशाल दत्तात्रय बनसोडे याने, रमण साबळे याचा गळा दाबुन, खुन केला. त्यानंतर, विशाल दत्तात्रय बनसोडे याने, सांगोला येथील, अनकढाळ टोल नाक्याजवळील एका पेट्रोलपंपावरून पेट्रोल व डिझेल आणुन, कोणाची बॉडी आहे हे ओळखु येवु नये म्हणून, त्या बॉडीवर पेट्रोल व डिझेल टाकुन पेटवुन दिले असल्याचे सांगितले.** इसम नामे- विशाल दत्तात्रय बनसोडे याचे सांगणे प्रमाणे, सपोनि/संदिप पाटील व त्यांचे तपास पथकानी, सांगोला पोलीस ठाणेच्या अभिलेखावर गुन्हा दाखल आहे अगर कसे? यांची माहिती घेतली असता, **अज्ञात इसमाचा खुन करून पुरावा नष्ट केले बाबत, सांगोला पोलीस ठाणेस गु.र.नं.३२६/२०२३ भादंवि-३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे, तसेच मागील १५ महिन्यापासुन सदर गुन्ह्यातील मयताची अद्याप ओळख पटली नसल्याचे व गुन्ह्यातील आरोपी देखील मिळाला नसल्याचे माहिती प्राप्त झाली.** त्यावरून फौजदार चावडी पोलीस ठाणे मिसिंग नं-३६/२०२३ मधील बेपत्ता इसम नामे रमन सातप्पा साबळे याचा पैशाच्या वादातुन विशाल दत्तात्रय बनसोडे याने खुन केला असल्याची कबुली दिली. विशाल दत्तात्रय बनसोडे यास **सांगोला पोलीस ठाणेस गु.र.नं.३२६/२०२३ भादंवि-३०२,२०१ या गुन्ह्याचे पुढील तपासकामी रिपोर्टसह हजर करून, दीड वर्षानंतर अर्जावरून फौजदार चावडी पो.स्टे. मिसिंग नं-३६/२३ मधील बेपत्ता इसमाचा शोध तसेच सांगोला पो.स्टे. गुरनं-३२६/२३ हा खुनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे.**

सदरची कामगीरी, मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. संदिप पाटील, व पोलीस अंमलदार- विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, वसीम शेख, सायबर पो.स्टे. कडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता.**

Scanned with CamScanner